| | |
|---|---|
| **CNR NO. MHSN170048812020** | दाखल दिनांक - ०१.०७.२०२३<br>नोंदणी दिनांक - ०१.०७.२०२३<br>निकाल दिनांक - ०७.०३.२०२६<br>कालावधी - <u>वर्ष</u> <u>महिने</u> <u>दिवस</u><br>०२ ०८ ०६ |

**<u>विटा येथील अतिरीक्त सत्र न्यायाधीश, विटा यांचे न्यायालयात</u>**

**<u>(पिठासीन अधिकारी - उषा वि. इंदापुरे)</u>**

**<u>विशेष खटला क्र. २८८/२०२४</u>**
**(जुना विशेष खटला क्रं.१७६/२०२३)**

**निशाणी - ९४**

**<u>नमुना-अ</u>**

| | |
|---|---|
| **फिर्यादी** | महाराष्ट्र शासनतर्फे पी.आय. पोलीस स्टेशन, आटपाडी<br>जि. सांगली. |
| **उपस्थिती** | सरकारतर्फे अति.सरकारी अभियोक्ता,<br>श्री. एस.आर. हिंगमिरे |
| **आरोपी** | **१) गोपीचंद कुंडलिक पडळकर**<br>वय- ३९ वर्षे, व्यवसाय - काही नाही,<br>**२) ब्रम्हदेव कुंडलिक पडळकर**<br>वय – ४१ वर्ष, धंदा - काही नाही<br>दोघेही रा. पडळकरवाडी, ता. आटपाडी, जिल्हा सांगली |
| **उपस्थिती** | आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. ए.एस.जाधव |

**<u>नमुना-ब</u>**

| | |
|---|---|
| घटना दिनांक | दि. २१.०३.२०११ पासून ते दि.०४.०१.२०२२ चे दरम्यान |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | ०४.०१.२०२२ |

| | |
|---|---|
| दोषारोप दिनांक | २७.०६.२०२५ |
| पुरावा सुरु केल्याचा दिनांक | ०४.१०.२०२५ |
| न्यायनिर्णयासाठी राखुन ठेवलेली तारीख | - |
| न्यायनिर्णय तारीख | ०७.०३.२०२६ |
| शिक्षेची तारीख, जर असेल तर | लागू नाही. |

## नमुना-क

| अ. क्रं. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीन वर आरोपीस मुक्त केल्याचा दिनांक | कलम | निर्दोष किंवा दोषी | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये आरोपी किती दिवस तुरुंगामध्ये राहिले होते |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | गोपीचंद कुंडलिक पडळकर | १९.०७.२०२२ | १७.०१.२०२२ रोजी दोन्ही आरोपींना अटकपूर्व जामीन मंजूर | भा.द.वि.कलम ४२०, ४४७ सह ३४ व अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध सुधारीत) कायदा कलम३(१)(एफ), ३(१) (जी) व ३(२)(व्हीए) अन्वये | निर्दोष मुक्त | नाही | लागू नाही. |
| २. | ब्रम्हदेव कुंडलिक पडळकर | १९.०७.२०२२ | | | निर्दोष मुक्त | नाही | लागू नाही. |

## नमुना-ड

## अ- सरकारपक्षातर्फे साक्षीदार

| अ.क्र | साक्षीदाराचे नाव | निशाणी | साक्षीदाराचा प्रकार |
|---|---|---|---|
| १. | जगन्नाथ दादा जानकर | २६ | स्वतंत्र साक्षीदार |
| २. | दत्तात्रय किसन गळवे | २९ | घटनास्थळ पंच साक्षीदार |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | रमेश दशरथ पाटील | ३४ | स्वतंत्र साक्षीदार |
| ४. | सुधीर शिवाजी पाटील | ३७ | ठाणे अंमलदार |
| ५. | श्रीमती पद्मावती शिवाजीराव कदम | ५२ | तपास अधिकारी |

**ब- बचावपक्षातर्फे साक्षीदार**

| अनु.क्रं. | साक्षीदाराचे नाव | साक्षीदाराचा प्रकार |
|---|---|---|
| --- | ----- | ----- |

**क- न्यायालयातर्फे साक्षीदार**

| अनु.क्रं. | साक्षीदाराचे नाव | साक्षीदाराचा प्रकार |
|---|---|---|
| --- | ----- | ----- |

**सरकारपक्ष/ बचावपक्ष/ कोर्ट तर्फे निशाणी क्रमांक दिलेल्या कागदपत्रांची यादी-**
**अ- सरकारपक्षातर्फे**

| **अनु.क्रं.** | **निशाणी क्रमांक** | **वर्णन** |
|---|---|---|
| १. | ३०/स.सा.क्र.२ | घटनास्थळ पंचनामा |
| २. | ३८/स.सा.क्र.४ | वर्दीजबाब |
| ३. | ३९/स.सा.क्र.४ | छापील एफ.आय.आर. |
| ४. | ५३/स.सा.क्र.५ | पोलीस अधिक्षक यांनी तपास करणेबाबत दिलेला आदेश |
| ५. | ५४/स.सा.क्र.५ | आटपाडी पो.स्टे.ला आरोपीला अटक करणेबाबत दिलेले प्राधिकार पत्र |
| ६. | ५५/स.सा.क्र.५ | आटपाडी पो.स्टे.ला पंच हजर ठेवणेबाबत दिलेले पत्र |
| ७. | ५६/स.सा.क्र.५ | आटपाडी पो.स्टे. यांनी पंच मिळणेबाबत कृषी अधिकारी, पंचायत समिती यांना दिलेले पत्र |

| | | |
|---|---|---|
| ८. | ५७/स.सा.क्र.५ | पंचायत समिती आटपाडी यांनी पंच नेमणूक केल्याबाबतचा कार्यालयीन आदेश |
| ९. | ५८/स.सा.क्र.५ | रमेश दशराथ पाटील याच्या जबाबातील अधोरेखांकीत भाग ए |
| १०. | ५९/स.सा.क्र.५ | उप-विभागीय पोलीस अधिकारी यांनी जिल्हाधिकारी सांगली यांना दिलेले पत्र |
| ११. | ६०/स.सा.क्र.५ | उप विभागीय पोलीस अधिकारी विटा यांनी दुययम निबंधक आटपाडी यांना दिलेले पत्र |
| १२. | ६१/स.सा.क्र.५ | उप विभागीय पोलीस अधिकारी विटा यांनी तहसिलदार आटपाडी यांना दिलेले पत्र |
| १३. | ६२/स.सा.क्र.५ | उप विभागीय पोलीस अधिकारी विटा यांनी दुययम निबंधक, आटपाडी यांना दिलेले पत्र |
| १४. | ६३/स.सा.क्र.५ | उप विभागीय पोलीस अधिकारी विटा यांनी तलाठी, झरे यांना दिलेले पत्र |
| १५. | ६४/स.सा.क्र.५ | उप विभागीय पोलीस अधिकारी विटा यांनी सहा.अभियंता, विदयुत वितरण कंपनी, खरसुंडी यांना दिलेले पत्र |
| १६. | ६५/स.सा.क्र.५ | उप विभागीय पोलीस अधिकारी विटा यांनी शाखाधिकारी, बॅक ऑफ इंडीया, झरे यांना दिलेले पत्र |
| १७. | ६६/स.सा.क्र.५ | उप विभागीय पोलीस अधिकारी विटा यांनी तहसिलदार आटपाडी यांना पाईपलाईनच्या पंचनामा करण्याकरीता दिलेले स्मरण पत्र-१ |
| १८. | ६७/स.सा.क्र.५ | उप विभागीय पोलीस अधिकारी विटा यांनी तहसिलदार यांना पाईपलाईनच्या पंचनामा करण्याकरीता दिलेले स्मरण पत्र-२ |
| १९. | ६८/स.सा.क्र.५ | उप विभागीय पोलीस अधिकारी विटा यांनी सहा.अभियंता, विदयुत वितरण कंपनी, आटपाडी यांना दि.२०.०४.२०२२ रोजी |

| | | |
|---|---|---|
| | | स्मरण पत्र -१ दिले. |
| २०. | ६९/स.सा.क्र.५ | उप विभागीय पोलीस अधिकारी विटा यांनी दि.२०.०१.२०२२ रोजी फिर्यादीला विहीर पाण्यासंदर्भात झालेल्या कराराची प्रत हजर करणेबाबतचे पत्र |
| २१. | ७०/स.सा.क्र.५ | उप विभागीय पोलीस अधिकारी विटा यांनी दि.३०.०१.२०२२ रोजी आरोपीला विहीर पाण्यासंदर्भात झालेल्या कराराची प्रत हजर करणेबाबतचे पत्र |
| २२. | ७१/स.सा.क्र.५ | जगन्नाथ जानकर याच्या जबाबातील अधोरेखांकीत भाग ए |
| २३. | ७२/स.सा.क्र.५ | उप विभागीय पोलीस अधिकारी विटा यांनी न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग, आटपाडी यांना फिर्यादीचा जबाब नोंदविण्याबाबतचे दि.२०.०१.२०२२ रोजीचे पत्र |
| २४. | ७३/स.सा.क्र.५ | गट क्र.५५७/1 चा ७/१२ उतारा |
| २५. | ७४/स.सा.क्र.५ | गट क्र.५५६ चा ७/१२ उतारा |
| २६. | ७५/स.सा.क्र.५ | गट क्र. ६२४ चा ७/१२ उतारा |
| २७. | ७६/स.सा.क्र.५ | फेरफार क्र.११८१ ची प्रत |
| २८. | ७७/स.सा.क्र.५ | दि.२०.०४.२०२२ चे उप कार्यकारी अभियंता विदयुत वितरण कंपनी यांचे उप विभागीय पोलीस अधिकारी विटा यांना दिलेले पत्र |
| २९. | ७८/बचावपक्षाने मान्य | फिर्यादीच्या नावे असलेले लाईट बील |
| ३०. | ७९/बचावपक्षाने मान्य | कनिष्ठ विधी अधिकारी यांनी फिर्यादीला लाईटबील थकबाकी असल्याबाबत दिलेली नोटीस |
| ३१. | ८०/बचावपक्षाने मान्य | कनिष्ठ विधी अधिकारी यांनी फिर्यादीला लाईटबील थकबाकी असल्याबाबत दिलेली |

| | | |
|---|---|---|
| | | नोटीस |
| ३२. | ८१/स.सा.क्र.५ | दुययम निबंधक, आटपाडी यांनी गट क्र.६२४ व ५५६ चे खरेदी दस्ताची प्रतीसह पोलीस स्टेशन आटपाडी यांना दिलेले पत्र |
| ३३. | ८२/बचावपक्षाने मान्य | गट क्र.६२४ व ५५६ च्या मिळकतीबाबत केलेल्या खरेदी दस्ताची सही शिक्याची प्रत |
| ३४. | ८३/१/बचावपक्षाने मान्य | फिर्यादीचे जातीचे दाखल्याची सही शिक्याची प्रत |
| ३५. | ८४/१/बचावपक्षाने मान्य | आरोपी क्र.२ चे बोनाफाईड प्रमाणपत्र |
| ३६. | ८५/बचावपक्षाने मान्य | महादेव अण्णा वाघमारे याचे बॅक ऑफ इंडीया या बॅकेच्या खाते उता-याची प्रत |
| ३७. | ८६/बचावपक्षाने मान्य | महादेव अण्णा वाघमारे याचे बॅक ऑफ इंडीया या बॅकेच्या खाते उता-याची प्रत |
| ३८. | ८३/बचावपक्षाने मान्य | विहीरीच्या पाण्या संदर्भातीतील कराराची प्रत |
| ३९. | ८४/बचावपक्षाने मान्य | दस्त गोषवारा भाग -२ चा उतारा |

**ब-बचावपक्षातर्फे**

| अनु.क्रं. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| --- | ----- | ----- |

**क- न्यायालयातर्फे**

| अ.क्रं. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| - | - | - |

**ड- मुद्देमालाचे वर्णन**

| अनु.क्रं. | मुद्देमालाचा क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| -- | ----- | ----- |

## - न्या य नि र्ण य -
## (पारीत केला दिनांक ०७ मार्च २०२६ )

आरोपी क्रं.१ व २ यांचेविरुद्ध भारतीय दंड संहिता कलम ४२०, ४४७ सह ३४ व अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध सुधारीत) कायदा २०१५ कलम ३(१)(एफ), ३(१) (जी) व ३(२) (व्हीए) अन्वये सदरचा खटला दाखल केला आहे.

**सरकारपक्षाचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे -**

२. वर्दीजबाब देणार याची झरे गावच्या हद्दीत शेतजमीन गट क्र.६२४ क्षेत्र ४ हे ८६ आर व गट क्र.५५६ क्षेत्र २६ गुंठे अशी जमीन असून २००८ साली सदरच्या शेतजमीनीबाबत आरोपींसोबत तोंडी व्यवहार ठरविला होता. गावातील राजू पांडूरंग अर्जुन व रमेश दशरथ पाटील यांच्यासमक्ष आरोपींनी रक्कम रु.१०,५०,०००/- च्या मोबदल्यात सदरच्या शेतजमीनी खरेदी घेण्याबाबतचा व्यवहार ठरला. मोबदल्याच्या रकमेपैकी रु.१,००,०००/- रोख दिले. वर्दीजबाब देणा-याने बॅक ऑफ इंडीया येथील बॅक खाते क्र.४१०६ मध्ये रु.१,००,०००/- पैकी रु.७०,०००/- दि.११.०८.२००८ रोजी जमा केली. आरोपींच्या सांगण्याप्रमाणे दि.२१.०३.२०११ रोजी सदरच्या व्यवहाराबाबतचा खरेदीदस्त आटपाडी येथील दुययम उप-निबंधक कार्यालय येथे केला. वर्दीजबाब देणार याच्या हक्कात त्याचा भाऊ विश्वास वाघमारे, बहीण शांताबाई विनायक कदम व मयत बहीण विनंता आनंदा खरात हिची मुलगी मनिषा भरत सोनवणे व मंजुश्री व मुलगा धनंजय अण्णा खरात यांनी कुलमुखत्यारपत्र दिले होते. वर्दीजबाब देणा-याने या कुलमुखत्यारपत्राच्या आधारे सदरचा खरेदी दस्त केला. दस्तात नमूद केल्याप्रमाणे वेळोवेळी रु.४,००,०००/- दस्ताच्यावेळी रु.७५,०००/- दिले असा

उल्लेख केला असून उर्वरित रक्कम रु.५,७५,०००/- काही दिवसांनी देतो असे आरोपींनी सांगितले, परंतु त्यांनी रक्कम देण्यास टाळाटाळ केली. सदरच्या दस्तात खरेदीची रक्कम रु.१०,५०,०००/- अशी नमूद केली नाही, परंतु जगन्नाथ जानकर व गावातील इतर लोकांना या व्यवहाराबाबत माहीत आहे. वर्दीजबाब देणा-याने आरोपींकडे उर्वरित रकमेची मागणी केली तेव्हा आरोपींनी पैसे देण्यास टाळले. झरे व आजूबाजूच्या गावात आरोपींची दहशत असल्यामुळे त्यांच्याविरुध्द कोणीही साक्ष देण्यास तयार होत नाहीत.

**३.** वर्दीजबाब देणार याची व त्याच्या नातेवाईकांची आरोपींनी फसवणूक केली असून वर्दीजबाब देणा-याच्या नावे कोणतीही जमीन नाही. झरे गावातील गट क्र.५५७ मधील २ गुंठे विहीरीचे क्षेत्र वर्दीजबाब देणा-याच्या नावे असून, त्या विहीरीचे पाणी व विहीर वर्दीजबाब देणार याच्या मालकीची आहे. २०११ साली त्या विहीरीपासून गट क्र.६२४ पर्यंत ४ इंची पाईपलाईन केली आहे. त्या विहीरीतील पाणी घेण्याचा हक्क खरेदीदस्ताने आरोपींना दिलेला नसताना आरोपींनी त्या क्षेत्रात बेकायदेशीरपणे अतिक्रमण करुन कब्जा केला व विहीरीतील पाणी व पाईपलाईनचा वापर करीत आहे. अश्याप्रकारे दोनही आरोपींनी वर्दीजबाब देणारा व त्याच्या नातेवाईकांची फसवणूक केल्यामुळे दि.२४.१२.२०२१ रोजी पोलीस अधिक्षक सांगली यांच्याकडे वर्दीजबाब देणा-याने तक्रारी अर्ज दिला. दि. ०४.०१.२०२२ रोजी पोलीस स्टेशन आटपाडी येथे कायदेशीर तक्रार देवून व्याजासहीत नुकसान भरपाई मिळावी अशी विनंती वर्दीजबाब देणा-याने केली आहे.

**४.** वर्दीजबाब देणा-याचे तक्रारीवरुन पोलीस स्टेशन,आटपाडी येथे गु.र. नं. ६/२०२२, भारतीय दंड संहिता कलम ४२०,४४७ सह ३४ व अनुसूचित

जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) कायदा कलम ३(१)(फ) (ग), ३(२)(५अ) अन्वयेचा गुन्हा दाखल झाला. सदरच्या प्रकरणाचा तपास उप-विभागीय पोलीस अधिकारी श्रीमती पद्मा कदम यांनी केला. तपासकामी त्यांनी घटनास्थळ पंचनामा केला, साक्षीदारांचे जबाब नोंदविले, कागदपत्र हस्तगत केले व आरोपींविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

**५.** सरकारपक्षातर्फे दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन करुन आरोपींविरुद्ध भारतीय दंड संहिता कलम ४२०,४४७ सह ३४ व अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) कायदा कलम ३(१)(एफ), ३(१)(जी), ३(२)(व्हीए) चे दोषारोप (नि.क्र.१९) मी नोंदविले. आरोपींना सदरचे दोषारोप वाचुन दाखविले व त्यांच्या भाषेत समजावुन सांगितले. आरोपींनी त्यांच्यावर तोहमत केलेले गुन्हे नाकबुल केले व खटला पुढे चालविण्याची विनंती केली. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(बी) अन्वये आरोपींचे निवेदने अनुक्रमे नि.८८ व ८९ अन्वये नोंदविण्यात आले. आरोपींविरुध्द खोटी तक्रार केल्याचा बचाव आरोपींनी घेतला.

**६.** सरकारपक्षाच्या कथनावरून खालील मुद्दे माझे विचारार्थी उपस्थित होतात. सदरचे मुद्दे व त्यावर माझे कारणांसह निष्कर्ष खालीलप्रमाणे देत आहे.

| **अ.क्र** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१.** | दि.२१.०३.२०११ ते ०४.०१.२०२२ च्या कालावधी पर्यंत वर्दीजबाब देणा-याची व तो कुलमुखत्यार म्हणून ज्या नातेवाईकांकरीता गट क्र.६२४ क्षेत्र ४ हे ८६ आर व गट क्र.५५६ क्षेत्र २६ आर च्या मिळकतीचे दि.२१.०३.२०११ रोजी दुययम निबंधक कार्यालय, आटपाडी नोंदणीकृत खरेदीदस्त नोंदविला. त्यापूर्वी २००८ साली वर्दीजबाब देणारा व आरोपी यांच्यात झालेल्या तोंडी कराराप्रमाणे | |

| | | |
|---|---|---|
| | सदरच्या खरेदीचा मोबदला रु.१०,५०,०००/- ठरला. या मोबदल्यापैकी रु.१,००,०००/- दि.११.०८.२००८ रोजी दिले व रु.४०,०००/- व रु.७५,०००/- खरेदी दस्ताच्या दिवशी रोख दिले. स्टॅम्प फी कमी व्हावी म्हणून खरेदीदस्तात मोबदल्याची रक्कम कमी दाखविली व त्यानंतर उर्वरित रक्कम रु.४,७५,०००/- देणार असल्याचे वचन देवूनही दिली नाही व अश्याप्रकारे आरोपींनी समान उद्देश साध्य करण्याकरीता संगनमत करुन वर्दीजबाब देणा-याची व त्याच्या नातेवाईकांची फसवणूक केल्याचे व विहीरीचे पाणी वापराबाबत आरोपींनी खोटे करारपत्र तयार केल्याचे सरकारपक्षाने शाबित केले आहे काय ? | नकारार्थी |
| २. | वर नमूद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपींनी समान उदिष्ट साध्य करण्याकरीता वर्दीजबाब देणा-याच्या मालकी व ताब्यातील गट क्र.५५७/१ च्या मिळकतीत अपराध करण्याच्या उद्देशाने व वर्दीजबाब देणा-याला धाकदपटशा दाखविण्याकरीता त्याचा अपमान करण्याकरीता व त्याला त्रास देण्याच्या उददेशाने त्या मिळकतीत प्रवेश करुन बेकायदेशीरपणे थांबल्याचे व त्यामुळे आरोपींनी फौजदारीपात्र अतिक्रमण/कब्जा केल्याचे सरकारपक्षाने शाबीत केले आहे काय ? | नकारार्थी |
| ३. | वर नमूद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपींनी समान उदिष्ट साध्य करण्याकरीता वर्दीजबाब देणा-याच्या शेतातील विहीरीचे पाणी पाईपलाईनच्या साहयाने बेकायदेशीरपणे व वर्दीजबाब देणा-याला कोणताही मोबदला न देता गट क्र.५५७/१ च्या मिळकतीपासून गट क्र.६२४ पर्यंत नेल्याचे सरकारपक्षाने शाबित केले आहे काय ? | नकारार्थी |
| ४. | वर नमूद तारीख, वेळ व ठिकाणी वर्दीजबाब देणारा हा अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीचा सदस्य असताना आरोपींनी समान उदिष्ट साध्य करण्याकरीता वर्दीजबाब देणा-याला त्याच्या मालकीच्या मिळकतीतून त्याला चुकीच्या पध्दतीने बेदखल केले व वर्दीजबाब देणा-याच्या परवानगीशिवाय त्याच्या मालकीच्या विहीरीतील पाण्याचा वापर विनामोबदला केल्याचे सरकारपक्षाने शाबीत केले आहे? | नकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| **५.** | वर नमूद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपींनी समान उदिष्ट साध्य करण्याकरीता वर्दीजबाब देणारा हा अनुसुचित जाती व जमातीचा सदस्य आहे व त्याच्या मालकीच्या मिळकती आहेत याची आरोपींना माहीती असताना वर्दीजबाब देणा-याची जमीन बेकायदेशीरपणे ताब्यात घेवून व विनामोबदला, विनापरवानगी वर्दीजबाब देणा-याच्या मालकीच्या विहीरीतील पाणी घेवून वर्दीजबाब देणारा व त्याच्या नातेवाईकांची आरोपींनी फसवणूक केल्याचे सरकारपक्षाने शाबीत केले आहे काय ? | नकारार्थी |
| **६.** | आदेश काय ? | दोनही आरोपींना निर्दोषमुक्त करण्यात आले आहे. |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>मुद्दे क्र.१ ते ६ करीता</u> -**

**७.** सदरचे सर्व मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्यामुळे व पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्याकरीता सदरचे सर्व मुद्दे एकत्रीत विचारात घेण्यात आले आहेत.

८. जगन्नाथ (स.सा.क्रं.१) याने पुराव्यात सांगितले की, २००९ ते २०१५ या कालावधीत तो राष्ट्रीय समाज पक्षाचा सामाजिक कार्यकर्ता असल्यामुळे व आरोपी राष्ट्रीय समाज पक्षाचे काम पाहत होते, त्यामुळे आरोपींना तो ओळखतो. पक्षाच्या कामाकरीता झरे गावी त्याचे जाणे-येणे होते. फिर्यादी महादेव वाघमारे त्याच्या परिचयाचा होता व तो (महादेव वाघमारे) मयत आहे. सरकारपक्षातर्फे साक्षीदाराचा उलटतपास घेतला असून सरकारपक्षाच्या कथनास पाठींबा मिळेल असा कोणताही मजकूर साक्षीदाराने मान्य केला नाही.

९. दत्तात्रय (स.सा.क्र.२) हा पंच साक्षीदार असून त्याने पुराव्यात सांगितले की, दि.०४.०१.२०२२ रोजी पंचायत समिती कार्यालयातून फोन

आल्यामुळे झरे येथील गट क्र.५५७/१ या महादेव वाघमारे यांच्या शेतात गेला, त्यावेळी दुसरा पंच पवार हा त्याच्यासोबत होता. घटनास्थळ म्हणजे एक विहीर, पाईपलाईन, मोटार पंप व पेटी हे महादेव वाघमारे यांनी दाखविले. त्याठिकाणी जबरदस्तीने मोटार टाकून पाणी घेत असल्याचे फिर्यादीने सांगितले. सर्व वस्तुस्थितीचा पोलीसांनी पंचनामा केला व त्याने त्यावर सही केली.

**१०.** साक्षीदाराने त्याच्या उलटतपासात सांगितले की, प्रशासकीय कामानिमित्त तो पोलीस स्टेशनला जातो. कार्यालयातील पारदर्शकता, जबाबदारी व वक्तशिरपणाकरीता हालचाल रजिस्टर ठेवले जाते व त्या रजिस्टरची पाहणी गटविकास अधिकारी करतात. पंचनाम्याचे काम पूर्ण झाले त्यावेळी अंधार पडला होता हे तो सांगू शकत नाही.

**११.** रमेश(स.सा.क्र.३) याच्या पुराव्यात असे आले आहे की, फिर्यादी महादेव हा त्याच्या गावचा आहे. तो कोणत्या जातीचा आहे याची त्याला माहीती नाही. सरकारपक्षातर्फे घेतलेल्या उलटतपासात त्याने मान्य केले की, पोलीसांनी त्याला पोलीस स्टेशनला बोलावले होते. त्याने त्वरीत खुलासा केला, पो.स्टे.ला तो कामानिमित्त गेला होता त्यावेळी पोलीसांनी त्याचे नाव व गाव विचारले व त्याने पोलीसांना ती माहीती दिली.

**१२.** सुधीर (स.सा.क्र.४) या साक्षीदाराने पुराव्यात सांगितले की, पो.स्टे. आटपाडी येथे ठाणे अंमलदार म्हणून कार्यरत असताना फिर्यादी महादेव आण्णा वाघमारे हा दि.०४.०१.२०२२ रोजी पोलीस स्टेशनला आला व त्याने तक्रार दिली की, झरे गावच्या हद्दीत त्याचे गट क्र.५५६,५५७ व ६२४ या शेतजमीनी होत्या. गट क्र.६२४ मधील ४ हेक्टर ८६ आर, ५५६ मधील ६ गुंठे या क्षेत्राच्या शेतजमीनीबाबतचा तोंडी खरेदी व्यवहार २००८ साली आरोपींसोबत रक्कम रु.

१०,५०,०००/– च्या मोबदल्यात झाला होता. त्या व्यवहारातील उर्वरित रक्कम रु.४,७५,०००/– आरोपींनी त्याला दिली नाही व गट क्र.५५७ मधील दोन गुंठयाच्या क्षेत्रातील विहीरीची पाईपलाईन गेली असून आरोपींनी जबरदस्तीने त्या क्षेत्राचा कब्जा फिर्यादीकडून घेऊन बेकायदेशीरपणे विहीरीतील पाण्याचा वापर १० वर्षे करीत होते. त्या विहीरीच्या पाण्याचे वापराची वार्षिक रक्कम रू १,००,०००/–प्रमाणे एकूण रूपये १०,००,०००/–व खरेदीची उर्वरित रक्कम रू४,७५,०००/–अशी एकूण रक्कम रु.१४,७५,०००/– आरोपींनी फिर्यादीला दिली नाही व त्याची फसवणूक केली. फिर्यादीने त्याच्यासमक्ष वर्दीजबाबावर सही केली. सदरच्या साक्षीदाराने सरतपासात सांगितलेला संपूर्ण मजकूर खोटा सांगितला आहे असे बचावपक्षातर्फे साक्षीदाराला उलटतपासात विचारण्यात आले परंतु साक्षीदाराने त्याचे उत्तर नकारार्थी दिले आहे.

**१३.** पदमावती कदम (स.सा.क्र.५) तपास अधिकारी असून त्यांनी पुराव्यात सांगितले की, तपासकामी फिर्याद व गुन्हयाच्या अनुषंगाने खरेदीखत व इतर कागदपत्रांचे अवलोकन करुन पोलीस स्टेशन आटपाडी यांना आरोपींना अटक करण्याकरीता प्राधिकार पत्र दिले. तसेच पोलीस स्टेशन आटपाडी यांना पंच हजर ठेवणेबाबत पत्र दिले. कृषी अधिकारी पंचायत समिती आटपाडी यांनी पो.स्टे. आटपाडी यांच्या पत्रानुसार पंच नेमल्याबाबतचे पत्र दिले. फिर्यादीने सांगितलेल्या साक्षीदारांचे जबाब नोंदविले. साक्षीदार रमेश दशरथ पाटील याच्या जबाबातील अधोरेखांकीत भाग ए मधील मजकूर त्याच्या सांगण्याप्रमाणे बरोबर नोंदविलेला आहे. अनुसूचित जाती जमाती अंतर्गत गुन्हा असल्यामुळे जिल्हाधिकारी, सांगली व आयुक्त समाजकल्याण यांना जलद अहवाल दिला. दुयम निबंधक, आटपाडी यांना खरेदीखत व कुलमुखत्यारची प्रत मिळण्याकरीता, तहसिलदार, आटपाडी यांना पाईपलाईनचा पंचनामा करुन मिळण्याकरीता, तलाठी, झरे यांना घटनास्थळाचे उतारे मिळण्याकरीता, सहा.अभियंता, विदयुत वितरण कंपनी यांना

विज बील भरणा माहीती मिळण्याकरीता, शाखाधिकारी बॅक ऑफ इंडीया, झरे यांना फिर्यादीच्या बॅक खात्याची माहीती मिळण्याकरीता दि.०५.०१.२०२२ रोजी पत्र व्यवहार केला.

**१४.** साक्षीदार यांनी पुराव्यात पुढे सांगितले आहे, तहसिलदार, आटपाडी यांना पाईपलाईनचा पंचनामा करण्याकरता दोन स्मरणपत्रे दिली. सहा.अभियंता, विदयुत वितरण कंपनी यांना दि.२०.०४.२०२२ रोजी स्मरणपत्र दिले दि.२०.०१.२०२२ रोजी फिर्यादीला व दि.३०.०१.२०२२ रोजी आरोपीसोबत झालेल्या विहीर पाण्यासंदर्भात कराराची प्रत हजर करण्याबाबत पत्र दिले. त्या पत्राच्या अनुषंगाने फिर्यादी व आरोपींनी म्हणणे सादर केले. जगन्नाथ दादा जानकर याचा जबाब त्याच्या सांगण्याप्रमाणे बरोबर नोंदविला. दि.२०.०१.२०२२ रोजी न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग,आटपाडी यांना फिर्यादीचा जबाब नोंदविण्याकरीता पत्र दिले. गट क्र.५५७/१, ५५६ व गट क्र.६२४ चे ७/१२ उतारे व फेरफार क्र.११८१, विदयुत वितरण कंपनीने पत्रासोबत दिलेले लाईटबील व नोटीसा अभिलेखात जमा केल्या. दि.२०.०४.२०२२ रोजी दुययम निबंध आटपाडी यांचेकडून गट क्र.६२४ व ५५६ च्या मिळकतीबाबत झालेल्या खरेदीदस्ताची प्रत प्राप्त झाली.

**१५.** साक्षीदार यांनी उलटतपासात मान्य केले आहे, फिर्यादीच्या जातीचा दाखला समाजकल्याण कार्यालयातून हस्तगत केला नाही व फिर्यादीच्या जातीच्या दाखल्याची पडताळणी समाजकल्याण कार्यालयातून केली नाही.

**१६.** सरकारपक्षातर्फे सरकारी वकील श्री एस.आर.हिंगमिरे यांनी युक्तीवाद केला की, फिर्यादी मयत असल्यामुळे ठाणे अंमलदार यांच्या पुराव्याद्वारे फिर्यादीतील मजकूर सिध्द केला आहे. तपास अधिकारी यांनी पुराव्यात फिर्यादीतील मजकूराबाबत व त्यांनी केलेल्या तपास कामाबाबत सांगितले आहे.

घटनास्थळाचा पंच साक्षीदार सरकारपक्षाच्या कथनास पाठींबा देत आहे. साक्षीदार जगन्नाथ हा फिर्यादी व आरोपी यांना ओळखतो. बचावपक्षातर्फे मान्य केलेल्या कागदपत्रांवरुन फिर्यादी हा हिंदू महार समाजाचा व आरोपी ब्रम्हदेव हा हिंदू धनगर समाजाचा असल्याचे स्पष्ट होते. सरकारपक्षातर्फे साक्षीदाराने दिलेला तोंडी पुरावा व आरोपींनी मान्य केलेल्या कागदपत्रांवरुन दोनही आरोपींनी फिर्यादीसोबत त्याच्या शेतीजमीनीबाबत तोंडी व्यवहार करुन त्यानंतर कमी मोबदला दर्शवून खरेदीदस्त नोंदविला परंतु तोंडी कराराप्रमाणे ठरलेली उर्वरीत मोबदल्याची रक्कम वर्दीजबाब देणा-याला दिली नाही व त्याची फसवणूक केली हे सरकारपक्षाने शाबीत केले आहे. तसेच फिर्यादीच्या मालकीच्या विहीर असलेल्या शेतजमीनीत आरोपींनी बेकायदेशीरपणे अतिक्रमण करुन वर्दीजबाब देणा-याच्या परवानगीशिवाय, विनामोबदला विहीरीतील पाणी पाईपलाईनच्या साहयाने स्वतः च्या शेतजमीनीपर्यंत नेवून वर्दीजबाब देणा-याची फसवणूक केली व फौजदारीपात्र अतिक्रमण केल्याचे सरकारपक्षाने शाबीत केले आहे. वर्दीजबाब देणारा हा अनुसूचित जाती व जमातीचा असल्याचे आरोपींना माहीत असताना त्याच्या मालकीच्या शेतजमीनीत बेकायदेशीरपणे प्रवेश करुन विहीरीतील पाणी बेकायदेशीरपणे घेवून वर्दीजबाब देणा-याची फसवणूक केल्याचेही सरकारपक्षाने सिध्द केले आहे. अश्याप्रकारे आरोपींवर तोहमत केलेले गुन्हे सरकारपक्षाने शाबीत केले असल्यामुळे आरोपींना कडक शासन व्हावे.

**१७.** आरोपींतर्फे श्री.ए.एस.जाधव वकीलांनी युक्तीवाद केला की, आरोपींवर तोहमत केलेले गुन्हे सरकारपक्षाने सिध्द केले नसल्यामुळे आरोपींना निर्दोषमुक्त करण्यात यावे.

**१८.** आरोपींवर तोहमत केलेले गुन्हे सिद्ध होण्याकरीता आरोपींनी

संगनमत करुन वर्दीजबाब देणारा हा अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीचा आहे याची माहीती असताना त्याच्याकडून त्याच्या व त्याच्या नातेवाईकाची जमीन खरेदी घेतली परंतु त्या खरेदीची ठरल्याप्रमाणे संपूर्ण मोबदल्याची रक्कम वर्दीजबाब देणा-याला दिली नाही. त्याचप्रमाणे वर्दीजबाब देणा-याच्या मालकीच्या विहीरीतील पाण्याशी आरोपींचा कोणताही संबंध नसताना त्या विहीरीतील पाण्याचा वापर बेकायदेशीरपणे केला व पाण्याच्या वापराचा मोबदला वर्दीजबाब देणा-याला दिला नाही, अश्याप्रकारे आरोपींनी वर्दीजबाब देणा-याची फसवणूक केल्याचे सरकारपक्षाने संशयरहित शाबीत करणे आवश्यक आहे.

**१९.** सरकारपक्षातर्फे दिलेल्या पुराव्याचा विचार करण्यापूर्वी बचावपक्षातर्फे मान्य केलेले व तपास अधिकारी यांनी तपासकामी हस्तगत केलेल्या कागदपत्र पाहणे आवश्यक आहे. आरोपी व फिर्यादी महादेव वाघमारे यांनी स्वतःकरीता व विश्वनाथ आण्णा वाघमारे, शांताबाई विनायक कदम, मनिषा भारत सोनवणे, धनंजय आण्णा खरात व मंजुश्री आण्णा खरात यांचा मुखत्यार म्हणून झरे येथील गट क्र. ६२४ क्षेत्र ४ हे ८६ आर व गट क्र.५५६ चे क्षेत्र २६ आर या मिळकतींचे नोंदणीकृत खरेदीदस्त दुययम निबंधक कार्यालय, आटपाडी येथे नोंदविले. दि.२१.०३.२०११ रोजी दुयय्म निबंधक कार्यालय, आटपाडी येथे खरेदीदस्त नोंदविला असा मजकूर वर्दीजबाबात नमूद आहे. तपास अधिकारी यांनी फिर्यादी व आरोपी यांच्यात गट क्र.६२४ व ५५६ च्या मिळकतीबाबत दि.२१.०३.२०११ रोजी झालेला खरेदीदस्त या प्रकरणात हस्तगत करुन दाखल केला नाही. वर्दीजबाब देणा-याने किंवा त्याच्या नातेवाईकांनी सदरचा दि.२१.०३.२०११ रोजी झालेल्या दस्ताची प्रत पोलीसांना वर्दीजबाब देताना किंवा तपासादरम्यान दिले नाही असेही अभिलेखातील कागदपत्रांवरुन दिसून येते.

**२०.** तपास अधिकारी यांनी तपासकामी फिर्यादीने सांगितलेल्या साक्षीदारांचे तपास टिपण नोंदविले असे पुराव्यात सांगितले असून वर्दीजबाबात जगन्नाथ जानकर याला फिर्यादी व आरोपी यांच्यात झालेल्या तोंडी कराराबाबत व दस्ताबाबत माहीती आहे असे नमूद केले आहे. जगन्नाथ जानकर या साक्षीदाराने त्याच्या सरतपासात त्याला आरोपी व फिर्यादी यांच्यातील जमीनीबाबतच्या व्यवहाराची माहीती नाही व त्यावेळी तो हजर नव्हता, तसेच झरे गावी तो फिर्यादीच्या घरी गेला नाही असे त्याने सरतपासात सांगितले आहे. यावरुन असे स्पष्ट होते साक्षीदाराने सरकारपक्षाच्या कथनास पाठींबा दिला नसल्यामुळे वर्दीजबाबातील सदरचा मजकूर शाबीत झाला नाही.

**२१.** मौजे झरे येथील गट क्रं.५५७/१, ५५६, ६२४ च्या ७/१२ उता-यांचे अवलोकन केले असता असे दिसून येते. गट क्र.५५७/१ मधील ०.०२ आर क्षेत्रात महादेव आण्णा वाघमारे यांची विहीर असल्याचे इतर अधिकारात नमूद केले आहे. गट क्र.५५६ व ६२४ च्या ७/१२ उता-यावर आरोपींच्या नावाची नोंद फेरफार क्र.४२४८ अन्वये झालेली आहे. या मिळकतींच्या उता-यावर महाराष्ट्र राज्य सहकारी कृषी व ग्रामीण विभाग बॅक लिमीटेड, मुंबई, जिल्हा सांगली यांच्या नावाची नोंद होती ती कमी करण्यात आली. तपासअधिकारी यांनी तपासकामी फेरफार क्रं.४२४८ हस्तगत केला नाही. फेरफार क्र.११८१ अन्वये गट क्र.५५७/अ मधील विहीरीची नोंद घेण्यात आल्याचे दिसून येते.

**२२.** दि.०१.०२.२०२२ व दि.२०.१०.२०२१ रोजी कनिष्ठ विधी अधिकारी यांनी महादेव आण्णा वाघमारे यांना विज देयकाची रक्कम न भरल्यामुळे विदयुत पुरवठा खंडीत करणार असल्याचे कळविले आहे. तसेच चालू विज देयकाची रक्कम १५ दिवसाच्या आत भरावे असेही वर्दीजबाब देणा-याला कळविले.

वर्दीजबाब देणा-याच्या कथनानुसार २०११ साली गट क्र.६२४ व ५५४ च्या मिळकतींचे खरेदीदस्त झाले, त्यानंतर आरोपींनी गट क्र.५५७ मधील २ गुंठे विहीरीतील पाण्याचा वापर विना मोबदला केला. कनिष्ठ विधी अधिकारी यांनी वर्दीजबाब देणा-याला विज बिल भरण्याबाबत दिलेल्या नोटीसला वर्दीजबाब देणा-याने उत्तर दिले नाही. विहीरीतील पाण्याचा वापर आरोपी करीत होते त्यामुळे आरोपी विज बील देय भरण्यास जबाबदार आहेत अश्या आशयाची कोणतीही तक्रार वर्दीजबाब देणा-याने आरोपींकडे किंवा संबंधीत विज कार्यालयात केली नाही. दाखल कागदपत्रावरुन असे स्पष्ट होते वर्दीजबाब देणा-याने विज बील भरले नसल्यामुळे विज खंडीत करणार असल्याची नोटीस त्याला देण्यात आली, त्यामुळे तो स्वत: विज बील भरण्यास जबाबदार होता.

**२३.** तपासकामी तपास अधिकारी यांनी हस्तगत केलेल्या नोंदणीकृत दस्त क्र.३०५/११ च्या दस्तात शाखा व्यवस्थापक, शाखा आटपाडी यांनी बॅक कर्जाबाबत दिलेल्या दि.१७.०३.२०११ च्या पत्रात वर्दीजबाब देणा-याने पाणी पुरवठा योजनेसाठी कर्ज घेतले होते व ती रक्कम बॅकेत भरल्याचे व दि.१७.०३.२०११ रोजी गट क्र.५५६,५५७, ६२४ व ७०३ या जमीनी तारण म्हणून दिल्या होत्या, परंतु वर्दीजबाब देणा-याने एक रकमी कर्ज रक्कम रु.२,६६,०००/- दि.१७.०३.२०११ रोजी भरल्यामुळे या जमीनींबाबत कोणताही खरेदीविक्री करण्यास बॅकेची हरकत नाही असा दाखला दिला. सदरच्या दाखल्यावरुन असे स्पष्ट होते दि.१७.०३.२०११ रोजी बॅकेने दाखला दिला त्यानंतर दि.२३.०३.२०११ रोजी सदरचे खरेदीदस्त नोंदवण्यात आले. सदरच्या खरेदीदस्तात भरण्याची रक्कम रु.४,७५,०००/- मिळाल्याचा उल्लेख केला असून त्याबाबत कोणतीही तक्रार राहिली नाही असेही नमूद केले आहे. आरोपी व वर्दीजबाब देणारा यांच्यात २००८ साली गट क्र.६२४ व ५५६ च्या

मिळकतीबाबत तोंडी व्यवहार ठरला व मोबदल्याची रक्कम रु.१०,५०,०००/- देण्याचे ठरले असे साक्षीदार जगन्नाथ दादा जानकर व रमेश दशरथ पाटील यांनी पुराव्यात सांगितले नाही. तपास अधिकारी यांच्या पुराव्याद्वारे सदरच्या दोनही साक्षीदारांच्या तपासटिपणातील अधोरेखांकीत भाग ए शाबीत केला असला तरीही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार यांनी आरोपी व वर्दीजबाब देणारा यांच्यातील तोंडी व्यवहाराबाबत काहीही सांगितलेले नसल्यामुळे तपास अधिकारी यांच्या पुराव्यावर विश्वास ठेवून तसा तोंडी व्यवहार झाला होता असा निष्कर्ष काढता येणार नाही. स्टॅम्प फी कमी व्हावी म्हणून कमी रकमेचा व्यवहार खरेदीदस्तात दाखविला असे ठाणे अंमलदार अथवा तपास अधिकारी यांनी त्यांच्या पुराव्यात सांगितले नाही.

**२४.** गट क्र.५५७ मधील विहीरीतील पाणी आरोपींनी बेकायदेशीरपणे वापरले ही बाब शाबीत करण्याकरीता ठाणे अंमलदार व तपास अधिकारी यांच्या पुराव्या व्यतिरिक्त इतर स्वतंत्र साक्षीदार यांचा पुरावा सरकारपक्षाने दिलेला नाही. फिर्यादीचे नातेवाईक म्हणजे विश्वास वाघमारे, शांताबाई कदम, मनिषा सोनवणे, धनंजय आण्णा खरात व मंजुश्री यापैकी कोणीही आरोपींविरुध्द तक्रार केलेली नाही. तपासकामी फिर्यादीच्या या नातेवाईकांचे तपासटिपण तपास अधिकारी यांनी नोंदविले नाही.

**२५.** फिर्यादी हा हिंदू महार जातीचा असल्याचे आरोपींना माहीत होते व आरोपी हे हिंदू धनगर समाजाचे आहे असे सरकारपक्षाच्या एकाही साक्षीदाराने पुराव्यात सांगितलेले नाही. सरकारपक्षातर्फे जगन्नाथ दादा जानकर, राजू पांडुरंग अर्जुन व रमेश दशरथ पाटील हे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असून या साक्षीदारांपैकी साक्षीदार जगन्नाथ दादा जानकर व रमेश दशरथ पाटील या दोनही साक्षीदारांनी घटनेबाबत त्यांच्या पुराव्यात काहीही सांगितले नाही. तसेच वर्दीजबाब देणारा व

आरोपी यांच्या जातीबाबतही पुराव्यात सांगितले नाही. साक्षीदार राजू पांडूरंग अर्जुन याला जामीनबंधपत्र काढण्यात आले तरीही त्याला न्यायालयात हजर ठेवून त्याचा पुरावा नोंदविण्यात सरकारपक्ष अपयशी ठरला.

**२६.** वर्दीजबाबातील मजकूराचे अवलोकन केले असता असे दिसून येते, आरोपी व वर्दीजबाब देणारा यांच्यामध्ये झालेल्या व्यवहारातून वर्दीजबाब देणा-याची फसवणूक झाली असे वर्दीजबाब देणा-याचे कथन आहे. वर नमूद केल्याप्रमाणे वर्दीजबाब देणारा व आरोपी यांच्यात तोंडी करार झाला होता ही बाब सरकारपक्षाने सिध्द केली नाही. तसेच जो व्यवहार नोंदणीकृत दस्ताने करणे कायदयाने बंधनकारक आहे, त्या व्यवहाराबाबत केलेला तोंडी व्यवहार मान्य करता येणार नाही. सरकारपक्षाची सदरची केस कागदोपत्री पुराव्यावर अवलंबून आहे. मूळात आरोपी व वर्दीजबाब देणारा यांच्यात झालेल्या जमीनीबाबतचा व्यवहार हा वर्दीजबाबात नमूद असलेल्या रकमेप्रमाणे ठरल्याचे सरकारपक्षाच्या स्वतंत्र साक्षीदारांनी सांगितले नाही व तपास अधिकारी, ठाणे अंमलदार यांना आरोपी व वर्दीजबाब देणारा यांच्यात झालेल्या जमीनीच्या त्या व्यवहाराची वर्दीजबाब नोंदविण्यापूर्वी माहीती असण्याचे कारण नाही.

**२७.** एकंदरीत पुराव्यावरुन आरोपींनी ठरलेल्या व्यवहारापैकी उर्वरीत रक्कम वर्दीजबाब देणा-याला देणे असल्याचे व आरोपींनी ती रक्कम वर्दीजबाब देणा-याला दिली नसल्याचे, वर्दीजबाब देणा-याच्या मालकीच्या विहीर असलेल्या शेतजमीनीत आरोपींनी वर्दीजबाब देणा-याला त्रास देण्याच्या उद्देशाने प्रवेश केल्याचे, वर्दीजबाब देणा-याचा अपमान केल्याचे सरकारपक्षाने शाबीत केले नाही.

२८. अनुसूचित जाती व अनुसुचित जमाती कायदयाअंतर्गत दाखल केलेल्या गुन्हा शाबीत होण्याकरीता घटनेच्यावेळी फिर्यादी हा अनुसुचित जाती व अनुसुचित जमातीचा व्यक्ती असून त्याची जात आरोपीला माहीती असल्याचे व ती घटना साक्षीदारांच्या समक्ष सार्वजनिक ठिकाणी घडल्याचे सिध्द होणे आवश्यक आहे.

२९. वर्दीजबाब देणारा मयत असून ठाणे अंमलदार यांच्यामार्फत शाबीत केलेल्या वर्दीजबाबातील कथनास वर्दीजबाब देणा-याने सांगितलेल्या साक्षीदारांनी (ज्यांचे तपासटिपण तपासअधिकारी यांनी नोंदविले) दुजोरा दिलेला नाही. ठाणे अंमलदार, तपास अधिकारी व पंच साक्षीदार यांच्या पुराव्यावरुन २००८ व २०११ रोजी आरोपी व वर्दीजबाब देणारा यांच्यात ठरलेला व्यवहार शाबीत झाला असे म्हणता येणार नाही. सदरचे साक्षीदार हे त्या व्यवहाराचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नाहीत.

३०. एकंदरीत पुराव्याचे एकत्रितपणे अवलोकन केले असता, सरकारपक्षाचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार सरकारपक्षाच्या कथनास पाठींबा देत नाहीत. त्यांनी घटनेबाबत काहीही सांगितले नाही. घटनास्थळ पंचनामा व आरोपींच्या जातीच्या दाखल्यावरुन आरोपी घटनास्थळी वर्दीजबाब देणा-याला त्रास देण्याकरीता गेले होते ही बाब सिध्द झाली नाही. अश्यापरिस्थीतीत पंच साक्षीदार, ठाणे अंमलदार व तपास अधिकारी यांच्या पुराव्यावरुन आरोपींनी वर्दीजबाब देणा-याची फसवणूक केली असा निष्कर्ष काढता येणार नाही, त्यामुळे सदर साक्षीदारांच्या पुराव्यावर विश्वास ठेवून आरोपींना शिक्षा देणे न्यायोचित होणार नाही. आरोपींवर तोहमत केलेले गुन्हे सरकारपक्षाने संशयरहीत सिद्ध केले नसल्यामुळे, आरोपींतर्फे वकीलांनी केलेला युक्तीवाद ग्राहय मानून मुद्दे क्रमांक १ ते ५ चे निष्कर्ष नकारार्थी

देवुन मुद्दा क्रमांक ६ करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

१. आरोपी क्रं.१) गोपीचंद कुंडलिक पडळकर, २) ब्रम्हदेव कुंडलिक पडळकर यांना फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २३५(१) अन्वये भारतीय दंड संहिता कलम ४२०, ४४७ सह ३४ व अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध सुधारीत) कायदा २०१५ कलम ३(१)(एफ), ३(१) (जी) व ३(२) (व्हीए) च्या गुन्हयातुन निर्दोषमुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपींनी दिलेले वैयक्तीक बंधपत्र व जामीन बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

३. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७-ए अन्वये रु.५०,०००/-प्रत्येकी जातमुचलका द्यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर केला.)

USHA VEERENDRA INDAPURE

Digitally signed by USHA VEERENDRA INDAPURE
Date: 2026.03.11 17:48:14 +0530

दिनांक - ०७/०३/२०२६ (उषा वि. इंदापुरे)
विटा. अतिरीक्त सत्र न्यायाधीश, विटा

CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F. file, are same word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | A. B. Kamble (Steno Grade-I) |
| Court | : | Addl. Sessions Judge,Vita |
| Date of order | : | 07.03.2026 |
| Signed by Presiding officer on | : | 11.03.2026 |
| Uploaded on | : | 11.03.2026 |